आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

९ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- वस्तू आणि सेवा कर परिषदेची चोपन्नावी बैठक केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु

- राज्य विधानसभा निवडणुकीत १६० जागा लढवण्याची भाजपाची तयारी

- कोलकात्याच्या राधागोविंद कार रुग्णालयातल्या डॉक्टरांनी संप मागे घ्यावा आणि रुग्णालयाने त्यांच्यावर कारवाई करु नये अशी सर्वोच्च न्यायालयाची सूचना

- राज्याच्या अनेक भागात अद्याप पावसाचा जोर

**आणि**

- बांगलादेशाविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेद्वारे ऋषभ पंतचं भारतीय संघात पुनरागमन

<><><><><>

जीएसटी, म्हणजे वस्तू आणि सेवा कर परिषदेची चोपन्नावी बैठक आज नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सुरु आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी आणि सर्व राज्यांचे अर्थमंत्री बैठकीला उपस्थित आहेत. गेल्या जून महिन्यात झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत लोखंड, पोलाद आणि ॲल्युमिनियमच्या दुधाच्या कॅनवर बारा टक्के समान जीएसटी दर लागू करण्याची शिफारस करण्यात आली होती. भारतीय रेल्वेकडून सर्वसामान्य जनतेल्या पुरवल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म तिकिटं, विश्रामगृह, प्रतीक्षालयं, बॅटरी-

संचलित कार सेवा अशा सेवांवर जीएसटी लागू केला जाऊ नये, अशीही शिफारस या परिषदेनं केली होती.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपानं १६० जागा लढवाव्या. त्यातल्या किमान १२५ जागा जिंकण्याचं उद्दिष्ट ठेवावं यावर भाजपाच्या कालच्या बैठकीत चर्चा झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.  केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल रात्री मुंबईत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याशी जागावाटपाची अनौपचारिक चर्चा सुरू झाली आहे. पण त्यांना ७० हून अधिक जागा देण्यासंबधी निर्णय काळजीपूर्वक घ्यावा, अशी अपेक्षा  राज्यातल्या नेत्यांनी व्यक्त केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आणि जिंकून येण्याची क्षमता पाहूनच त्यांना जागा द्याव्यात, अशी चर्चा यावेळी झाल्याचं या बातमीत म्हटलं आहे.

लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुका लक्षात घेऊन ही निवडणूक महायुतीमधल्या पक्षांनी एकत्रितरित्या लढवावी. त्यात भाजपाची ‘मोठ्या भावाची’ भूमिका असावी, याचा पुनरुच्चार भाजपाच्या नेत्यांनी अमित शहा यांच्यासमोर केला. एकमेकांवर सार्वजनिकरित्या टीका टाळण्याचा सल्ला अमित शहा यांनी राज्यातल्या नेत्यांना दिल्याचंही या बातमीत म्हटलं आहे.

अमित शहा यांनी मुंबई दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं. त्यानंतर शहा यांनी मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचं

दर्शन घेतलं. तसंच वांद्रे पश्चिम इथल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचं दर्शन घेऊन पूजा केली.

मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशीष शेलार, भाजपा नेते रावसाहेब दानवे आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह आज तिसऱ्या दिवशीही बघायला मिळत आहे. मुंबईतल्या गणेशोत्सवाबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

महाराष्ट्राबाहेरही गणेशोत्सव उत्साहाने साजरा होतो. उत्तर प्रदेशातल्या कानपूर इथं महाराष्ट्र मंडळाकडून गणेशोत्सव साजरा केला जात आहे. शंभर वर्षांची परंपरा असलेलं हे मंडळ मराठी पद्धतीनं गणपतीची पूजा अर्चना करतं. कानपूरमधले अनेक मराठी कुटुंबं या उत्सवात भक्ती भावानं सहभागी होतात. १९१९ साली महाराष्ट्र मंडळानं गणेशोत्सव साजरा करायला सुरुवात केली होती.

श्रोते हो, सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २९ सप्टेंबरला आकाशवाणीवरुन मन की बात कार्यक्रमाद्वारे देश-विदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११४ वा भाग असेल.

या कार्यक्रमासाठी आपल्या कल्पना आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर २७ सप्टेंबरपर्यंत देता येतील. तसंच माय जीओव्ही संकेतस्थळावरून देखील सूचना पाठवता येतील. हा कार्यक्रम २९ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन  प्रसारित  करण्यात  येईल.

<><><><><>

कोलकात्याच्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणी सुरू असलेल्या तपासाचा  ताजा अहवाल पुढच्या मंगळवारपर्यंत सादर करावा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज सीबीआयला दिल्या. सर्वोच्च न्यायालयानं याप्रकरणी स्वतःहून दाखल करून घेतलेल्या याचिकेची सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायाधीश जे बी पारडीवाला आणि  मनोज मिश्र यांच्या खंडपीठासमोर होत आहे.

निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप मागे घेऊन उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत कामावर हजर व्हावं असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. या संपात सहभागी झालेल्या डॉक्टरांवर कोणतीही कायदेशीर कारवाई करु नये, तसंच डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी, अशी सूचना ही सर्वोच्च न्यायालयानं दिली आहे.

<><><><><>

स्वातंत्र्याच्या लढ्यात कोवळ्या वयात आहुती देणाऱ्या नंदुरबारमधल्या बाल हुतात्म्यांना आज ८२ व्या स्मृतीदिनानिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. महात्मा गांधीजींच्या चलेजाव च्या नाऱ्याने प्रेरीत होऊन स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेणारे बाल हुतात्मा शिरीषकुमार मेहता यांच्यासह त्यांचे मित्र लालदाद शहा, धनसुकलाल वाणी, शशीधर केतकर, घनश्यामदास शहा यांच्यावर इंग्रज पोलिसांनी बेछूट गोळीबार केला होता. जिल्हा प्रशासनासह, जेष्ठ नागरीक आणि शालेय विद्यार्थ्यांनी देखील शहीद स्थळावर जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

**राज्यात** अनेक ठिकाणी अजूनही पावसाचा जोर आहे.

**गडचिरोली** जिल्ह्याच्या दक्षिण भागात काल रात्री मुसळधार पाऊस झाल्यानं पर्लकोटा नदीला पूर आला आहे. पुराचं पाणी भामरागड गावात शिरल्यानं काही कुटुंबांना निवारागृहात हलवलं आहे. पुरामुळे भामरागड-आलापल्ली मार्गावरची वाहतूक बंद आहे. मुलचेरा तालुक्यातही दिना नदीला पूर आल्यानं मुलचेरा-आष्टी मार्गही बंद असल्याची माहिती प्रशासनानं दिली. गेल्या चोवीस तासांत भामरागड तालुक्यात १६४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पैठणच्या जायकवाडी प्रकल्पात ९७ टक्क्याहून जास्त पाणीसाठा झाला असून आज धरणाचे दरवाजे उघडून विसर्ग करण्यात येणार आहे.

**रत्नागिरी जिल्ह्याच्या** सर्व तालुक्यांमध्ये यंदा पावसानं सरासरी ओलांडली असून सरासरीच्या ११५ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

**बीड** जिल्ह्यातही चांगला पाऊस झाल्यानं **मांजरा धरणात** पुरेसा जलसाठा झाला आहे. यामुळे लातूर शहरासह बीड जिल्ह्यातील केज, अंबाजोगाई तसंच धाराशिव जिल्ह्यातल्या कळंब शहराचा पाणी प्रश्न मिटला आहे. जिल्ह्याच्या मध्यम प्रकल्पात पाणीसाठा वाढल्यानं पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे. मात्र सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद, मूग पिकांचं नुकसान झालं आहे.

**सोलापूर जिल्ह्यात** पावसाला समाधानकारक सुरुवात झाल्यानं मोठ्या प्रमाणात खरीपाच्या पेरण्या झाल्या होत्या. चांगला पाऊस पडल्यानं उत्पन्नही चांगलं मिळेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र पाऊस उघडीप देत नसल्यानं काढणीला आलेली उडीद, मूग, सोयाबीन, बाजरी ही पीकं वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

**<><><><><>**

बांगलादेशविरुद्धच्या दोन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. चेन्नईतल्या एमए चिदंबरम मैदानावर १९ तारखेपासून ही मालिका सुरू होणार आहे. के. एल राहुल आणि ऋषभ पंत यांचं संघात पुनरागमन झालं आहे, तर यश दयाल पहिल्यांदाच खेळणार आहे. ऋषभ पंत डिसेंबर २०२२ नंतर पहिल्यांदाच भारताच्या संघात खेळणार आहे. रोहित शर्मा संघाचं नेतृत्व करणार आहे.

**//<><><><><>//**